# 'द टार्गेट'मध्ये चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूची कथा

प्रतिनिधी, पुणे

**आपल्या बुद्धिमत्तेवर** मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या 'नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लि.' या उद्योगाचे साम्राज्य राजकारणी, नोकरशाह, स्वार्थी भांडवलदार आणि दलाल यांची चांडाळ चौकडी उद्ध्वस्त करते. 'द टार्गेट' या पुस्तकातून जिग्नेश शहा या चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूची कथा वस्तुनिष्ठपणे मांडली आहे, असे मत 'द टार्गेट' पुस्तकाचे लेखक शांतनू गुहा रे यांनी व्यक्त केले.

बाजारातील मक्तेदारी मोडून काढल्याची किंमत म्हणून जिग्नेश शहा यांच्या जागतिक साम्राज्याचा कसा विध्वंस करण्यात आला याचा गौप्यस्फोट करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार गुहा रे यांच्या 'द टार्गेट' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन 'लोकसत्ता'चे सहायक संपादक मुकुंद संगोराम यांच्या हस्ते झाले. ऑथर्स अपफ्रंटचे संचालक मनीष पुरोहित या वेळी उपस्थित होते.गुहा रे म्हणाले, जिग्नेश शहा यांची कहाणी मोठी मनोरंजक आहे. कोणतेही पाऊल उचलताना तुम्ही कसे धाडसी असले पाहिजे याचे शहा हे उदाहरण आहेत. एक व्यक्ती आपल्या बुद्धीने, कष्टाने मोठे साम्राज्य कसे उभे करतो आणि एका धक्क्याने त्या व्यक्तीला त्या साम्राज्यापासून कसे दूर केले जाते याची कहाणी मांडली आहे.संगोराम म्हणाले, लोक बुद्धीला घाबरतात याचा प्रत्यय शहा यांच्या प्रकरणात पाहावयास मिळतो. त्यांच्याकडे पारदर्शकता होती. सध्या पारदर्शक राहणे हाच मोठा धोका झाला असून, ज्यांना सत्याच्या पाठीमागे उभे राहायचे आहे त्यांच्यासाठी ही कथा प्रेरणादायी आहे. बातमी ही दुसऱ्या दिवशी संपलेली असते, मात्र पुस्तकाचा परिणाम हा माणसाच्या मनावर दीर्घकाळ टिकणारा असतो.




**'द टार्गेट' या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन लेखक शांतनू गुहा रे आणि मनीष पुरोहित यांच्या हस्ते झाले.**